# University of Mumbai

परीक्षा विभाग / निकाल कक्ष,
दुसरा मजला,
छत्रपती शिवाजी महाराज भवन.
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी,
मुंबई ४०० ०९८.

**क्र.परीक्षा / परीक्षा अर्ज / निकाल कक्ष /** ४८६ **/ २०२५, दि. ३ ऑक्टोबर, २०२५**

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नीत / संचालित सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे व कल्याण उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, यांनी, मुंबई विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या परीक्षा <u>**हिवाळी सत्र २०२५**</u> पासून <u>**केंद्राधारित पद्धतीने (Center Based Venue)**</u> घेण्यात येणार आहेत. यानुसार, विद्यापीठाने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावरच विद्यार्थ्यांना हजर राहून परीक्षा द्यावी लागेल.

**त्यानुसार महाविद्यालयांनी खालील बाबींची दक्षता घ्यावी :**

१) प्रत्येक विद्यार्थ्यास त्याच्या सबंधित विद्यापीठाने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावरच परीक्षा देता येईल.
२) केंद्राबाबतची सविस्तर माहिती सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा प्रवेशपत्रात मिळेल.
३) परीक्षा केंद्राची माहिती विद्यार्थ्यास विद्यापीठाच्या डिजिटल पोर्टलवर ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आली आहे. Know your examination venue या लिंकवर विद्यार्थ्यांनी PNR टाकल्यास त्याला त्याची परीक्षा, त्याचा आसन क्रमांक व परीक्षा केंद्र याची तत्काळ माहिती मिळते.
४) परीक्षा सुरु होण्यापूर्वी महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन करावे व शिस्तपालनाबाबत स्पष्ट सूचना द्याव्यात.
५) परीक्षा संचालनाकरिता केंद्र महाविद्यालयास आवश्यक ते सर्व सहकार्य द्यावे.
६) परीक्षा सुरळीत व नियमबद्ध पद्धतीने पार पडण्यासाठी सर्व स्तरावर समन्वय राखावा.

वरील सूचना **अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्व संबंधितांनी हिवाळी सत्र** २०२५ पासून काटेकोरपणे अमलात आणाव्यात.

स्थळ : मुंबई
दि. : ३ ऑक्टोबर, २०२५

(डॉ. पूजा रौंदळे)
संचालिका
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित / संचालित सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे व कल्याण उपकेद्रांचे समन्वयक/संचालक

...२...

अ. प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषितः-

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई- ४०० ०९८.
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.
३. उपकुलसचिव (नाव नोंदणी विभाग), डॉ. आंबेडकर भवन, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.
४. उपकुलसचिव / मुख्य लेखापाल, वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई- ४०० ०९८.
५. सर्व वरिष्ठ यंत्रणा नियोजक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग, मुंबई- ४०० ०९८.
६. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.
७. सर्व यंत्रणा परीचालन अधिकारी, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, मुंबई- ४०० ०९८.
८. समन्वयक, MKCLपरीक्षा विभाग, मुंबई- विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषितः-

१. मा. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई-४०० ०३२.
२. उपकुलसचिव (जनसंपर्क), परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०९८.
३. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई- ४०० ०३२.
४. प्र. कुलगुरू / कुलसचिव / वित्त व लेखा अधिकारी / संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक

Pjaraundale

(डॉ. पूजा रौंदळे)
संचालिका
परीक्षा व मूल्यमापन मंडळ